लोकमत

15-10-2020

# स्पर्धा परीक्षेसाठी वृत्तपत्र वाचन महत्वाचे

## सुचित कुंभलकर : एस.चंद्रा महिला महाविद्यालयात राज्यस्तरीय वेबिनार

लोकमत न्यूज नेटवर्क

**आमगाव :** स्पर्धा परीक्षेच्या उद्देशाने वर्तमानपत्रातील कुठल्या प्रकारच्या बातम्या वाचाव्या तसेच त्या मधून कशा पद्धतीने नोट्स काढावे हे समजून घेणे गरजेचे आहे. वर्तमानपत्राचे वाचन कशा पद्धतीने करायला हवे यावर भर देत विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत जास्तीत-जास्त गुण प्राप्त करू शकतात. कारण स्पर्धा परीक्षेसाठी वृत्तपत्र वाचन महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन अमरावती येथील ध्येय अॅकेडमी संचालक सुचित कुंभलकर यांनी केले.

येथील एस.चंद्रा महाविद्यालयातील ग्रंथालय, राज्यशास्त्र व गृह विज्ञान विभागाच्या संयुक्तवतीने 'स्पर्धा परीक्षेत वृत्तपत्र वाचनाचे महत्व' या विषयावर आयोजित राज्यस्तरीय वेबिनारमध्ये मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जयंती निमित्त आयोजित या वेबिनारच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.तृष्णा कळंबे होत्या. संयोजक म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.कमलेश पाटील व राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रमोद सरदार उपस्थीत होते.

प्रास्ताविकातून प्राचार्या डॉ. कळंबे यांनी राज्यस्तरीय वेबिनारच्या आयोजनामागील उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरित करणे आहे असे सांगीतले. तसेच या वेबिनारद्वारे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी व वृत्तपत्र वाचन करताना ते कशा पद्धतीने करावे जेणे करुन विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासोबतच त्यांना त्याचा उपयोग स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करण्यासाठी कसा होईल ते सांगितले.

याप्रसंगी माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संचालन डॉ. सरदार यांनी केले. आभार प्रा.कमलेश पाटील यांनी मानले.

वेबिनारसाठी डॉ. देवानंद खोब्रागडे, डॉ. चंदा गावंडे, डॉ. ललीतकुमार ठाकुर, डॉ. अजय मून, प्रा.स्वप्नील भगत, प्रा.भावना खापर्डे, डॉ. दीक्षा बडोले, राजेश हातझाडे, मंगलदास गोंडाणे, धनसिंग ठाकुर, हेमकृष्ण कठाने, अमर गोडसे यांनी सहकार्य केले.

# एस चंद्रा महिला महाविद्यालयात मतदार दिवस साजरा

**आमगाव** ■ महाराष्ट्र शासनाच्या आदेशाप्रमाणे यश चंद्रा महिला महाविद्यालयात २५ जानेवारी रोजी ऑनलाइन मतदार दिवस साजरा करण्यात आला.

या दिवशी राज्यशास्त्र विभागातर्फे घोषवाक्य व निबंध स्पर्धा घेण्यात आली. घोषवाक्य स्पर्धेत शिल्पा शिंदे प्रथम प्रियंका येर द्वितीय व धनश्री तृतीय क्रमांक पटकावला. तर निबंध स्पर्धेमध्ये अमिता शरणागति ने प्रथम शरद दिपाली टेंबरे द्वितीय व धनश्री पाचे तृतीय क्रमांक पटकावला. याप्रसंगी प्राध्यापक प्रमोद सरदार यांनी मतदानाचे महत्त्व समजून सांगितले. प्राचीन काळी मतदानाचा अधिकार हा पैशावर आधारित होता मधल्या काळामध्ये ज्यांचे संबंध इंग्रज सोबत चांगले होते त्यांना मतदानाचा अधिकार होता आज मात्र संविधानाने सर्व भारतीयांना दोन हजार अठरा वर्षे पूर्ण झालेले आहेत सर्व स्त्री पुरुष मतदान करू शकतात सर्वांच्या मतदानच व्हॅल्यू एकच आहे अशाप्रकारे आपल्या भाषणातून त्यांनी समजून सांगितले या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.तृष्णा कळंबे उपस्थित होत्या. मतदान अधिकार सर्वांना आवश्यक आहे प्रत्येकाने मतदानाचा अधिकार वापरावा असे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## ४० हजाराची घरफोडी

**नवेगावबांध** ■ स्थानिक किराना दुकानाच्या छताचे टिन काढून चोरट्यांनी आलमारीत ठेवलेले ४० हजार रुपयाची रोकड लंपास केली. ही घटना २६ व २७ जानेवारीच्या रात्री दरम्यानची आहे. वैभव दिलीप सिपानी याच्या मालकीचे अनाज भंडार आहे. दुकानावरील फायबरचे छत फोडून अज्ञात चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला. दुकानात ठेवलेल्या आलमारीचे लॉक तोडून ४० हजार रुपयाची रोकड पडविली. या घटनेची नोंद नवेगावबांध

ePaper देशोन्नती
Sun, 30 January 2022
https://deshonnati.digitaledition.in/c/65914977

SCMM

HEAD
Department of Political Science
S. Chandra Mahila Mahavidyalay
Amgaon.

लोकमत

# राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थिनींची न्यायालयाला शैक्षणिक भेट



लोकमत न्यूज नेटवर्क

**आमगाव** : एस. चंद्रा महिला महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थिनींनी येथील कनिष्ठ स्तर न्यायालयात शैक्षणिक भेट दिली. या शैक्षणिक भेटीत विद्यार्थिनींनी न्यायालयाचे दैनंदिन कामकाज कशा पद्धतीने होते. तसेच न्यायालयात खटल्यांमध्ये होत असलेले आरोप-प्रत्यारोप, फिर्यादी, वकील, न्यायाधीश कशा पद्धतीने आपले कार्य करतात याची प्रत्यक्ष पाहणी केली.

शैक्षणिक भेटीदरम्यान न्यायमूर्ती धपाटे तसेच वरिष्ठ वकील बागडे यांनी मार्गदर्शन केले. या शैक्षणिक भेटीच्या आयोजनाकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तृष्णा कळंबे यांचे मार्गदर्शन लाभले. या शैक्षणिक भेटीसाठी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रमोद सरदार, इंग्रजी विभाग तथा आयक्यूएसी विभागप्रमुख प्रा. स्वप्नील भगत, प्रा. दीक्षा बडोले, मंगलदास गोंडाणे यांनी सहकार्य केले.

लोकमत

# एस.चंद्रा. महिला महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरिता मतदार नोंदणी शिबिर



लोकमत न्यूज नेटवर्क

**आमगाव :** स्थानिक एस.चंद्रा.महिला महाविद्यालयात शुक्रवारी संविधान दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. तृष्णा कळंबे होते. प्रा. कमलेश पाटील, मंगल गोंडाणे, डॉ. प्रमोद सरदार, डॉ. चंदा गावंडे, डॉ. ललितकुमार ठाकूर, प्रा. स्वप्नील भगत, डॉ. अजय मून, डॉ. देवानंद खोब्रागडे, प्रा. दीक्षा बडोले, प्रा. नीतेश मेश्राम, प्रा.उत्तरा तागडे, प्रा. वनिता दसरिया उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. तृष्णा कळंबे यांनी संविधानामुळे भारत देशामध्ये सर्वोत्कृष्ट लोकशाही निर्माण झाली आहे. सर्व नागरिकांना समान अधिकार व कर्तव्य संविधानाने बहाल केलेले आहे. मतदार नोंदणी शिबिराचा विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन केले. प्रमोद सरदार यांनी विद्यार्थ्यांना मतदार यादीत नोंदणी करण्याकरिता मार्गदर्शन केले.

निवडणुकीमध्ये आपल्या मतदानाचा योग्य वापर करावा. एक एक मताला किती महत्त्व असते, आहे. हे महत्त्व आपल्या संविधानामुळेच प्राप्त झाल्याचे सांगत संविधान दिनाचे महत्त्व, सविधानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. शिबिरात ४८ मतदारांची नोंदणी करण्यात आली.

webinarnewa.pdf


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापिठ, नागपुर संलग्नित

# एस.चंद्रा महिला महाविद्यालय आमगांव

जि.गोंदिया

## निमंत्रण पत्रिका


ग्रंथालय, राज्यशास्त्र व गुह विज्ञान विभाग
यांच्या संयुक्तविद्यमाने



भारतरत्न स्वर्गिय डॉ. ए.पि.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त "वाचन प्रेरणा दिवस" निमित्त निशुल्क ऑनलाईन वेबीनारचे आयोजन.

**विषय– "स्पर्धा परिक्षेत वृत्तपत्र वाचनाचे महत्व".**

दि.१५.१०.२०२० वेळ. सकाळी ११ ते १२



**माध्यम - झुम ॲप**

**मार्गदर्शक - श्रीसुचित संजयराव कुंभारकर**
संचालक, ध्येय अकॅडेमी, जि.अमरावती

नोंदणी लिंक – https://forms.gle/US1jEhSuHhMNhbHP9
वाट्सपग्रुप लिंक https://chat.whatsapp.com/CWuprxMxsPyHPin5M7oFMc

वेबिनारला उपस्थित राहाणाऱ्यांना व फिडबॅक फार्म भरणाऱ्यांनाच सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच वेबिनारची लिंक दि.१५.१०.२०२० रोजी सकाळी १० वा. वाट्सॲप ग्रुपवर पाठविण्यात येईल.

**आयोजक**
डॉ. तृष्णा एस. कळंबे
प्राचार्या एस.चंद्रा महिला महाविद्यालय. आमगांव जि.गोंदिया

संयोजक
प्रा.कमलेश र. पाटील

संयोजक
डॉ. प्रमोद डी. सरदार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

# S.Chandra Mahila Mahavidyalaya Amgaon Dist-Gondia

## Department of Political Science Programme
## Matadar Jagruti **date 06.03.2020**





**Discuss Study**

Participated studentsB.A.Part I year

Subject:- Important of Political Scince Date- 18-03-2021







Time: 18-03-2021 14:10
Note: BA I. Groop Discuss Class . Subject Impotant of politics
Powered by NoteCam


Time: 18-03-2021 14:26
Note: BA I. Groop Discuss Class . Subject Impotant of politics
Powered by NoteCam


Election 2021

Department of Political Science










Head

Dr. Pramod D. Sardar